विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषदेची
संशोधन पत्रिका

# अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९३०
(जाने.-जून २००९ / खंड २, अंक १)


- कृषी पतपुरवठा आणि कृषक कर्जबाजारीपणा : एक दृष्टीक्षेप
- Urbanisation and Environment
- मंदी व भारतीय अर्थव्यवस्था

अर्थशास्त्राच्या नैतिक आयामांचे समालोचन :

- The Search for Blissful World !
- अर्थशास्त्र आणि नीतिशास्त्र – फारकत की सहसंबंध ?
- प्रो. सेन के अर्थशास्त्र मे नीतिशास्त्र का विचार
- अर्थशास्त्र नैतिक की न नैतिक ?

- पीएच्.डी. प्रबंधांचा सारांश
- ग्रंथ परिचय
- ३२ व्या वार्षिक अधिवेशनाचा अहवाल

प्रा. विठ्ठल मा. घिगाघाटे
शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्था, अमरावती


विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषदेची

संशोधन पत्रिका


# अर्थमीमांसा


भारतीय सौर शके १९३०

(जाने.-जून २००९/ खंड २, अंक १)


## ॥ अनुक्रमणिका ॥


■ कृषी पतपुरवठा आणि कृषक कर्जबाजारीपणा : एक दृष्टीक्षेप
– अंजली कुळकर्णी ........ १

■ Urbanisation and Environment
- R.Y. Mahore ........ १५

■ मंदी व भारतीय अर्थव्यवस्था
– आर.बी. भांडवलकर ........ २९

-: अर्थशास्त्राच्या नैतिक आयामांचे समालोचन :-

■ The Search for Blissful World !
- S.P. Kulkarni ........ ३२

■ अर्थशास्त्र आणि नीतीशास्त्र– फारकत की सहसंबंध ?
– एच्.आर.तिवारी ........ ३९

■ प्रो. सेन के अर्थशास्त्र मे नीतिशास्त्र का विचार –
– उषा पाटील ........ ४५

■ अर्थशास्त्र नैतिक की न नैतिक ?
–मुक्ता जहागिरदार ........ ४७

-: पीएच्.डी. प्रबंधांचा सारांश :-

■ जागतिक व्यापार संघटना आणि भारताचे कृषी क्षेत्र –
– प्रशांत हरमकर ........ ५८

■ 'An Evaluation of Public Distribution System - A Case Study of Nagpur District'
- Samit Mahore ........ ६६

■ अकोला जिल्ह्यातील लघुउद्योगात काम करणाऱ्या बाल कामगारांच्या समस्या व आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण (कालखंड १९९५-२००१)–
– आर.के. शेख ........ ७३

-: ग्रंथ परिचय :-

■ शेतकऱ्यांच्या आत्महत्या : संदर्भ यवतमाळ जिल्ह्याचा
– विनायक देशपांडे ........ ७९

■ नवप्रवर्तन – सूत्र आर्थिक विकासाचे
– दि.व्यं. जहागिरदार ........ ८२

■ ३२ व्या वार्षिक अधिवेशनाचा अहवाल ........ ८५



❑ प्रमुख संपादक ❑

दि.व्यं. जहागिरदार

❑ सल्लागार मंडळ ❑

श्रीनिवास खांदेवाले

कमलाकर हणवंते

आर.बी.भांडवलकर

एच्.ए.हुद्दा



❑ संपादकीय पत्रव्यवहार ❑

दि.व्यं. जहागिरदार

''व्यंकटेश'', १२, गुलमोहर कॉलनी,
कॅम्प, अमरावती – ४४४ ६०२
दूरध्वनी (०७२१) – २६६१८५१

## संपादकीय .....

'अर्थमीमांसा' या संशोधनपत्रिकेचा खंड २, अंक १ आपल्यापुढे सादर करतांना मला विशेष आनंद होत आहे. विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषदेचे माजी अध्यक्ष, वर्तमान अध्यक्ष व कार्याध्यक्ष, कार्यवाह आणि सर्व कार्यकारिणी सदस्य तसेच सर्व सदस्य या आनंदात सहभागी आहेत याची मला सुखद जाणीव आहे. संशोधन पत्रिकेचा हा खंड २, अंक १ चंद्रपूर येथील परिषदेच्या ३३ व्या वार्षिक अधिवेशनात विमोचित होत आहे. संशोधन पत्रिकेचा खंड १, अंक १ देखील अंजनगांवसूर्जी येथे झालेल्या परिषदेच्या ३२ व्या अधिवेशनात विमोचित झाला होता हे आपणा सर्वांना माहित आहेच. हा अंक माजी अध्यक्ष व विविध तज्ञांना पाठविला होता. सांगण्यास आनंद होतो की अनेकांची या उपक्रमाचे स्वागत केले असून 'अर्थमीमांसा' ही पुढील काळात एक प्रतिष्ठीत व नाणावलेली संशोधनपत्रिका होईल ही आशा व्यक्त केली आहे. माजी अध्यक्ष डॉ. एस.ए.देशपांडे यांनी अर्थमीमांसेच्या पहिल्या अंकाचे स्वागत केलेच आणि त्यासाठी पाच हजार रूपयांची देणगीही दिली. त्याबद्दल संपादक या नात्याने मी परिषदेच्या वतीने त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

गेल्या वर्षी अर्थमीमांसेचा पहिला खंड प्रसिद्ध झाला. दरवर्षी किमान दोन अंक प्रसिद्ध व्हावेत अशी इच्छा होती. पण फक्त एक अंकच प्रसिद्ध होऊ शकला. मात्र यावर्षी दुसऱ्या खंडाचे दोन अंक निश्चित प्रसिद्ध होतील असा विश्वास आहे. आपल्याजवळील आर्थिक पाठबळ आणि अंकाचा खर्च विचारात घेऊन परिषदेच्या सदस्यांनी प्रत्येक अंक विकत घेतला पाहिजे. तसेच सुरूवातीस परिषदेच्या जिल्हा निहाय सदस्यांनी आपापल्या जिल्ह्यातील किमान पाच महाविद्यालयांना अंक विकण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. परिषदेचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष, सचिव या दृष्टीने भरघोस प्रयत्न करतील याची खात्री आहे.

या अंकात पाच प्रमुख लेख, दोन टिपणे, तीन पीएच् डी. प्रबंधांचा सारांश आणि दोन ग्रंथांचा परिचय हा सर्वस्वीकृत आकृतीबंध स्वीकारला आहे. आपली संशोधन पत्रिका ही बहुभाषी असावी म्हणून इंग्रजी, मराठी आणि हिंदी या तीनही भाषेत उपरोक्त लेख आहेत हे सांगतांना विशेष आनंद होत आहे. शेवटी ३२ व्या वार्षिक अधिवेशनाचा अहवाल सादर केला आहे. कृषि पतपुरवठा आणि कृषक कर्जबाजारीपणा–एक दृष्टीक्षेप हा अंजली कुळकर्णी यांचा लेख असून त्यांनी वर्तमानकाळातील कृषकांच्या कर्जबाजारीपणाचे स्वरूप

(पुढे चालू)

आणि कर्जपुरवठा करणाऱ्या स्त्रोतांची रचना, त्यांच्यातील बदल इ. बाबींचे विविध अहवालांच्या आधारे विवेचन केले आहे.आर.वाय.माहोरे यांच्या 'Urbanisation and Environment' या लेखात त्यांनी नागरीकरणाच्या वाढत्या प्रवृत्तीचे पर्यावरणावर कोणते परिणाम होत आहेत याचा थोडक्यात आढावा घेतला आहे. 'मंदी व भारतीय अर्थव्यवस्था' या टिपणात आर.बी.भांडवलकरांनी अमेरिकेतील वित्तीय संकटाचे स्वरूप स्पष्ट करून त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील संभाव्य परिणाम विषद केले आहे. वर्तमान संदर्भ असणाऱ्या ह्या टिपणाला म्हणूनच महत्त्व आहे. पुढील अंकात मंदी संबंधात आणखी काही लेख प्रसिद्ध केले जातील.

अर्थशास्त्र आणि नीतिशास्त्र यामधील संबंधाचे विवेचन करणारे तीन लेख व एक टिपण या अंकाचे आकर्षण ठरावे. एस.पी.कुळकर्णी यांनी 'Search for Blissful World!' या लेखात व्यापक परिप्रेक्ष्यातून अर्थशास्त्रातील तज्ञांनी आणि सोबत अन्य तत्त्ववेत्यांनी मानवी कल्याणाबाबत केलेल्या विचारांचा आढावा वर्तमानाच्या संदर्भात समर्पकपणे घेतला आहे. अर्थशास्त्र आणि नीतिशास्त्र –फारकत की सहसंबंध ? या लेखात एच्.आर.तिवारी यांनी भारतीय तत्त्ववेत्त्यांनी जे आर्थिक विचार स्पष्ट केलेत त्यांचा उल्लेख करून आधुनिक मतांची नोंद घेऊन अर्थशास्त्र व नीतिशास्त्र परस्परपूरक असल्याचे दाखविले आहे. मुक्ता जहागिरदार यांनी अर्थशास्त्र नैतिक की न–नैतिक ? या लेखात अर्थशास्त्राच्या स्वरूपाचे विवेचन करून अर्थशास्त्रासारखे सामाजिकशास्त्र नैतिक पैलूपासून पूर्णत: विलग होणे तत्त्वत: आणि व्यवहारत: असंभव असल्याचा निष्कर्ष काढला आहे. उषा एन्.पाटील यांनी 'प्रो. सेन के अर्थशास्त्र में नीतिशास्त्र का विचार' या हिंदीत लिहलेल्या टिपणीत प्रो. सेन यांनी स्वीकारलेल्या मूल्यांमुळे अर्थशास्त्र आणि नीतिशास्त्रांचा संबंध दृढ झाला हे थोडक्यात सांगितले आहे. प्रशांत हरमकर, समीत माहोरे आणि आर.के.शेख यांच्या पीएच्.डी. प्रबंधांचा सारांश थोडा सविस्तरपणे प्रसिद्ध केला आहे. इ.स. २००८ मधील मराठीत प्रसिद्ध झालेल्या दोन पुस्तकांचा परिचय अनुक्रमे विनायक देशपांडे आणि दि.व्यं.जहागिरदार यांनी करून दिला आहे.

हा अंक सिद्ध करतांना अनेकांनी तत्परतेने मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार. आपण आपले दर्जेदार लिखाण अर्थमीमांसेला पाठवावे, जेणे करून आपल्या संशोधनपर पत्रिकचा स्तर आणखी उंचावत जाईल ही इच्छा व्यक्त करून संपादकीय आवरते घेतो.

**– दि.व्यं.जहागिरदार**